# महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

मध्यवर्ती कार्यालय :- 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा- ४१५००१.

विज्ञान निर्भयता नीती

राज्य कार्याध्यक्ष संपर्क : 'भास्कर' ६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे - ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१० Email : avinashpatilmans@gmail.com


**– प्रसिद्धी पत्रक –** दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

## मदर तेरेसांना संत पदासाठी चमत्काराची अट नको, चमत्काराचा दावा सिद्ध करण्याचे आव्हान– महाराष्ट्र अंनिस

मदर टेरेसा यांनी संतपदाची कसोटी असलेली दुसऱ्या चमत्काराची अट पूर्ण केल्यामुळे त्यांना ४ सप्टेंबर रोजी संतपद बहाल करण्यात येणार असल्याचे पोप फ्रांसिस यांनी जाहीर केले आहे. त्याचा उत्सव १ ते ८ सप्टेंबर दरम्यान ख्रिश्चन धर्मियांचे धर्मपीठ असणाऱ्या व्हॅटिकन येथे आयोजित करण्यात आलेला आहे. दोन वर्षापूर्वी जाहीर केलेल्या सेवाभावी कार्यासाठी नोबेल प्राप्त मदर तेरेसा यांना संतपद देण्याची प्रक्रियेमध्ये दोन चमत्कार त्यांच्यामुळे केले गेल्याचे सांगण्यात आले होते. संतपद द्यायचेच असेल तर सेवाकार्यासोबत चमत्कार केल्याचा निकष ठेवण्याची गरज नाही असे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे जाहीर आवाहन करण्यात आले होते. तरीही संतपदासाठी मदर टेरेसा यांनी दोन चमत्कार केल्याचा दावा व्हॅटिकन सिटीचे पोप फ्रांसिस हे करीत असल्यास त्यांनी सदर चमत्काराचे दावे सिद्ध करावे असे आव्हान महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

मदर तेरेसा यांना सेवाभावी कार्यासाठी जगातील सर्वोच्च नोबेल पारितोषिक त्यांच्या आरोग्य सेवेतील योगदानासाठी मिळालेले आहे. आरोग्यसेवेचे मानवतावादी काम त्यांना संत म्हणण्यासाठी पुरेसे असताना यासाठी चमत्काराची अट ठेवणे हे वैज्ञानिक दृष्टीकोणाच्या मूल्य विरोधात असल्याने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती त्याचा निषेध करीत आहे. मदर तेरेसा यांच्या मृत्यूनंतर त्यांन संतपद देण्यासाठी २००३ साली जो पहिला चमत्काराचा दावा करण्यात आला, त्यालाही शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने विरोध केला होता. मदर तेरेसा यांचे नाव घेऊन प्रार्थना केल्यामुळे गंभीर स्वरुपाचे आजार हे चमत्काराने बरे होतात असा समज लोकांमध्ये पसरवणे हे त्यांना शास्त्रीय उपचारांपासून दूर नेणारे ठरते आणि त्यामुळे मृत्यूही येऊ शकतो. म्हणूनच चमत्काराची अट लोकांच्या शोषणाला कारणीभूत ठरू शकते. खरे तर, त्यांनी केलेले दीनदुबळ्याच्या सेवेचे काम हाच त्यांच्या संत प्रवृत्तीचा पुरावा मानला जाणे अपेक्षित आहे. अवैज्ञानिक चमत्काराची अट हे त्यांच्या मानवतावादी व सेवाभावी कामाचे अवमूल्यन आहे.

यापूर्वी ख्रिस्ति धर्मपीठाने खगोलशास्त्रज्ञ गॅलिलिओला दिलेल्या शिक्षेबद्दल तीनशे वर्षांनी का होईना माफी मागून सत्यशोधनाविषयी जी आस्था दाखवली होती, त्याप्रमाणे आतादेखील ख्रिस्ती धर्मियांच्या सर्वोच्च असणाऱ्या व्हॅटिकन सिटीतील धर्मपीठाने संत पदासाठी चमत्काराची अट रद्द करावी आणि नवीन पायंडा तयार करावा अशी मागणी महाराष्ट्र अंनिसतर्फे करण्यात आली होती. त्याला ख्रिश्चन धर्मपिठाच्या पोप व समुदायाकडून कुठलाही प्रतिसाद गेल्या वर्षभरात दिला गेला नाही हे खेदजनक आहे, त्याचा आम्ही निषेध करतो. जगाने अशा स्वरुपाच्या कुठल्याही चमत्कारसदृश दाव्यांचा पुरस्कार धर्म पिठांकडून भविष्यात करू नये असे आवाहन आम्ही करीत आहोत.

**विनीत,**

**(अविनाश पाटील)**
राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंनिस